26 FEB 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत

**आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचा कार्यक्रम : कलागुणांच्या उधळणी; आजही रंगणार सोहळा**

# शिवमहोत्सवाचे शानदार उद्घाटन

कोल्हापूर : 'इतनी बेचैन होके तुमसे मिली', 'बिन तेरे', या हिंदी चित्रपटांतील सदाबहार गीते सादर करीत संज्योती जगदाळे हिने श्रोतृवृंद मंत्रमुग्ध झालाच पण नंदेश उमाप यांनी सादर केलेल्या 'एक शिवाजी राजा' या गीतावर श्रोत्यांच्या टाळ्या पडल्या, तर एकापाठोपाठ सादर होणाऱ्या मराठी-हिंदी गीतांनी 'वन्स मोअर'ची फर्माईश केली जात होती, निमित्त होते शिवमहोत्सवाचे.

शिवाजी विद्यापीठातील आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे विद्यापीठातील लोककला केंद्रात शनिवारी शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मराठी-हिंदी गाण्यांचा आणि कॉमेडीचा 'यूथफूल तडका' या कार्यक्रमाने रंगत आणली.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची आज गरज आहे. शिवाजी महाराज यांचे नियोजन व शिस्त युवकांनी आत्मसात करावी. या महोत्सवातून मनोरंजनासोबतच नवीन कलाकार घडण्यास मदत होत आहे. व्हाईस ऑफ इंडिया फेम संज्योती जगदाळे 'हा हंसी बन गये हम' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात केली. बहारदार हिंदी गीते सादर करून उपस्थितांना खिळवून ठेवले. पाठोपाठ सुप्रसिद्ध लोककलावंत नंदेश उमप यांनी मराठी गीते सादर करून सर्वांना डोलण्यास भाग पाडले. त्यांच्या सादरीकरणानंतर महाराष्ट्राचा महागायक अभिजित कोसंबीने तर कार्यक्रमास एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले.

नसीर अत्तार



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात शनिवारी आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे आयोजित शिवमहोत्सवाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. यावेळी डॉ. प्रवीण कोडोलीकर, विशाल भारती, विक्रांत सोनावणे, डॉ. डी. आर. मोरे, संग्राम कोते-पाटील, चंगदेव बंडगर उपस्थित होते.



नंदेश उमप



संज्योती जगदाळे



अभिजित कोसंबी

## लघुपट महोत्सव आज

रविवारी सकाळी अकरा ते दुपारी दोन या वेळेत 'अॅन अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रॉडक्शन्स'च्या सहकार्याने दुसरा लघुपट महोत्सव होणार आहे. त्यात कोल्हापुरातील युवा दिग्दर्शकांचे लघुपट प्रदर्शित होतील. दुपारी साडेचार वाजता शिव-वनश्री पुरस्कार आणि शिवगौरव पुरस्काराचे वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

आकर्षक विद्युतरोषणाई, हाऊसफुल्ल सभागृहाने आणि बहारदार गीतांनी शनिवारची सायंकाळ शिवमहोत्सवातील अविस्मरणीय ठरली. याप्रसंगी विद्यीपाठाचे बी.सी.यु.डी. संचालक प्रा. डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विभागीय सहसंचालक डॉ. अजय साळी, महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर, सचिव डॉ. चांगदेव बंडगर, मंजित माने, नितीन पाटील, अॅड. सचिन आवळे, विश्वास माने, योगेश माने, विशाल कांबळे, डॉ. सरोज बीडकर यांच्यासह विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

26 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुण पिढीने शिवरायांच्या कार्याचे स्मरण करावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : सांस्कृतिक कार्यक्रमाने 'शिव-महोत्सवास' प्रारंभ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शिव-महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. प्रवीण कोडोलीकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. विलास नांदवडेकर, संग्राम कोते-पाटील, रोहित पाटील, चांगदेव बंडगर आदी. (छाया : संदीप मोरे)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करण्याच्या उद्देशाने शिव-महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी महाराजांची नियोजन व शिस्त या दोन गोष्टींवर रयतेचे स्वराज्य उभे केले. तरुण पिढीने शिवरायांच्या कार्याचे चिरंतन स्मरण करून त्यांचा वारसा जतन करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाचे वर्णन करणारे शाहिरी पोवाडे.. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या ओव्या, गवळण, भारूड ..हिंदी-मराठी गीतांचा नजराणा.. सोबतीला आकर्षक विद्युत रोषणाई अशा जल्लोषी वातावरणात बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने शिव-महोत्सवास शनिवारी सायंकाळी प्रारंभ झाला. यावेळी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या लोककला केंद्रात 'शिव-महोत्सव २०१७' चे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

संज्योती जगदाळे हिने मराठी-हिंदी गीतांचा नजराणा सादर केला. कितनी बैचेन होके तुझसे मिली, ये मेरा दिल प्यार का दिवाना, दुनिया में लोगों को धोखा हो जाता है, मोनिका- मोनिका ओ माय डार्लिंग अशी वेगवेगळी गीते सादर करून टाळ्या-शिट्ट्यांची दाद मिळविली. लोककलावंत नंदेश उमप यांनी 'जय-जय महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्र गीत सादर करून तरुणाईमध्ये स्फूलिंग चेतविले. यानंतर आधुनिक भारूड, गवळण, ओव्या सादर करून त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे उपस्थितांना दर्शन घडविले.

गायक अभिजित कोसंबी यांनी छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा पोवाडा गायला. 'गालावर खळी, डोळ्यात धुंदी' हे गीत सादर करून तरुणाईस ठेका धरायला लावले. उत्तरोत्तर कार्यक्रमाची रंगत वाढत गेली.

यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शिव-महोत्सवाचे संकल्पक डॉ. प्रवीण कोडोलीकर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष संग्राम कोते-पाटील, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, विशाल भारती, राजेंद्र मुसळे, शशिकांत सुतार, मयूर भलानी, संतोष कडाळे, राजू तेली, रोहित पाटील, अवधूत अपराध, डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते. सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सत्यजित कोसंबी यांनी निवेदन केले.

26 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांस्कृतिक कार्यक्रमांनी शिव-महोत्सवाला सुरवात

## शाहीर नंदेश उमप, संजोती जगदाळे, अभिजित कोसंबी यांनी तरूणाईची मने जिंकली : विद्यापीठ परिसर संगीतमय

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराजांवरील गौरव गीत, शाहिरी पोवाडे, गण गवळण, भारूड, ओव्या सादरीकरण आणि सोबतीला आकर्षक विद्युत रोषणाई, अशा वातावरणात शनिवारी शिव-महोत्सवाला सुरूवात झाली. मराठी-हिंदी चित्रपटातील बहारदार गाण्यांनी तर सायंकाळच्या सत्रात महोत्सवाची उंची वाढविली. या कार्यक्रमाने विद्यापीठ परिसर संगीतमय झाला होता.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती तर्फे विद्यापीठातील लोककला केंद्रात आयोजित शिव-महोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बीसीयुडीचे संचालक डॉ.डी.आर.मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष संग्राम कोते-पाटील, डॉ. प्रविण कोडोलीकर आदी मान्यवर उपस्थित होते.



कोल्हापूर : 'शिव-महोत्सवा'चे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. प्रविण कोडोलीकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. विलास नांदवडेकर, संग्राम कोते-पाटील, रोहित पाटील, चांगदेव बंडगर आदी.

संजोती जगदाळे हिने सुरूवातीलाच हिंदी चित्रपटातील 'नमी बन गये ...', ये मेरा दिल प्यार का दिवाना...' ही दोन गाणी सादर केली. तर लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचा वसा आणि वारसा जपणारे गायक, शाहिर नंदेश उमप यांनी आपल्या खड्या आवाजात गायलेल्या 'शतकांच्या यज्ञातून उठली एक दिव्य ज्वाला, आणि तर 'रांजण' या मराठी चित्रपटातील 'लख लख लखणारा हिरा, सह्याद्रीच्या शिरपेचावर झळकतो भगवा तुरा' या गाण्यांना 'जय जय जय शिवाजी' अशा गजरात व टाळया व शिट्या वाजवून प्रेक्षकांनी दाद दिली. कोल्हापूरचा सुपुत्र महागायक अभिजित कोसंबी यांने गायलेल्या 'दहा दिशांच्या दरी-खोऱ्यातून अरूणोदय झाला..', 'गालावर खळी....' या गाण्यांना तर प्रचंड प्रतिसाद मिळाला. या तिन्ही गायकांनी लहान मुलांपासून ते तरूणाईची मने जिंकली.



शाहीर नंदेश उमप



संजोती जगदाळे



अभिजित कोसंबी

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे रोहित पाटील, मंदार खोबरे, विक्रांत सोनवणे, मयुर भलानी, शशिकांत सुतार, राजू तेली, श्रीमती नागरबाई शिंदे, असलम शेख, मंदार पाटील, सागर बगाडे, डॉ. सरोज बिडकर, सागर चव्हाण, प्रा.शहाजी कांबळे, प्रियांका धनवडे, आजी-माजी विद्यार्थी आदी उपस्थित होते.

26 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिव-महोत्सवास उत्साहात प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** आजी–माजी विद्यार्थ्यांच्या प्रचंड गर्दीत व टाळ्या व शिट्यांच्या अलोट प्रतिसादात शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये १४ व्या शिव-महोत्सवानिमित्त हिंदी व मराठी गाण्यांचा सांगीतिक कार्यक्रम पार पडला. तत्पूर्वी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले, सध्याच्या युवा पिढीला विविध कलागुणांबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने साजरा होणारा शिव-महोत्सव हा युवकांच्या कलागुणांना वाव देणारा आहे. महोत्सवाच्या आयोजकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जोपासला आहे.

सांगीतिक कार्यक्रमाची सुरुवात व्हॉईस ऑफ इंडिया फेम संज्योती जगदाळे हिच्या गाण्यांनी झाली. तिने आपल्या बहारदार आवाजामध्ये





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिव-महोत्सवात पोवाडा सादर करताना प्रसिद्ध लोककलावंत नंदेश उमप. तर दुसऱ्या छायाचित्रात आजी-माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला शिव-महोत्सव पाहण्यासाठी प्रेक्षकांनी केलेली अलोट गर्दी.** (छाया : एस. अली)

एकापेक्षा एक सुरस गाणी सादर केली. यामध्ये 'कितनी बेचैन हूँ मैं, अगर तूम मिल जाओ जमाना छोड देंगे हम, यें मेरा दिल प्यार का दिवाना अशी गाणी सादर करत श्रोत्यांची मने जिंकली. तिच्या सादरीकरणानंतर श्रोत्यांतून टाळ्यांबरोबरच 'वन्स मोअर'चा गजर घुमत होता. प्रसिद्ध लोककलावंत नंदेश उमप यांनी 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्र गीत सादर केले. उमप यांनी नुकताच प्रदर्शित झालेल्या 'रांजण' या मराठी चित्रपटातील 'लख लख, लखणारा हिरा, सह्याद्रीच्या शिरपेचावर झळके भगवा तुरा' हा पोवाडा सादर केला. त्याचबरोबर त्यांनी भारुड, बोबडी गौळण आणि 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' या चित्रपटातील 'ओ राजे' हा पोवाडा सादर केला.

महागायक अभिजित कोसंबी याने प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे स्मरण करून देणारे 'अरुणोदय झाला' हे गाणे सादर केले. त्यानंतर अभिजितने सादर केलेल्या 'गालावर खळी डोळ्यांत धुंदी, ओठांवर खुले लाली गुलाबाची' हे गीत सादर केले. त्याच्या या सादरीकरणाला तरुणाईने प्रचंड प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन डॉ. सत्यजित कोसंबी यांनी केले. बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डी. के. गायकवाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष संग्राम कोते-पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कडोलीकर यांनी स्वागत, तर सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. मंजित माने, अनंत पाटील, अश्विनी जगताप, सागर चव्हाण, चंद्रकांत कुरणे, प्रियांका धनवडे, नितीन पाथरवट, नितीन पाटील, विश्वास माने, योगेश माने, अमर सकटे, मिलिंद कांबळे हे महोत्सवाचे समन्वयक म्हणून काम करत होते.

रविवारी सकाळी ११ वाजता अँन अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रॉडक्शन्सच्या सहकार्याने दुसरा लघुपट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. लघुपट महोत्सवाचे उद्घाटन अभिनेते-दिग्दर्शक स्वप्नील राजशेखर यांच्या हस्ते व दिग्दर्शक किरण साष्टे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. दुपारी ४.३० वाजता प्रमुख शिव पुरस्कार वितरण समारंभ व भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल. या कार्यक्रमात अभिनेता संजय मोहिते, अभिनेत्री राजश्री खटावकर, अमोल नाईक, संत ज्ञानेश्वर मालिका फेम दर्शन माजगावकर, इंडियन आयडॉल फेम प्रसेनजित कोसंबी, ई टीव्ही सुपर वुमन फेम वेदा सोनुले, गायिका वैदेही जाधव, कोरिओग्राफर सागर बगाडे, सँड आर्टिस्ट अमित माळकरी, श्वास अॅकॅडमीचे ओंकार शेटे हे सादरीकरण करणार आहेत.

26 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आदित्य वेल्हाळ



**शिवाजी विद्यापीठाचे मनोहारी दृश्य :** शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे शिवमहोत्सवानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य इमारत झळाळून निघाली आहे. वृत्त पान ३ वर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2017
पुढारी



कोल्हापूर : बॅचलर ऑफ आर्किटेक्चर परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक आल्याबद्दल श्रीनिवास धैर्यशील काटकर यांना 'आर्किटेक्चर श्री विजयसिंह शिंदे प्राईज' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. काटकर यांना डॉ. पद्मविभूषण, डॉ. अनिता काकोडकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. काटकर यांनी डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयातून आर्किटेक्चर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

26 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा दिनानिमित्त चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे मराठी राजभाषा दिनानिमित्त 'मराठी साहित्यातील विविध वाङ्‌मयीन प्रवाह' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र २८ रोजी होणार आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता चर्चासत्रास प्रारंभ होईल, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी दिली.



- राजन गवस यांची माहिती
- मंगळवारी आयोजन
- विविध विषयांवर निबंधवाचन

वाङ्‌मयीन संकल्पना व फलश्रुती या विषयाअंतर्गत पहिल्या सत्रात 'वाङ्‌मय प्रवाहाची संकल्पना' या विषयावर श्यामसुंदर मिरजकर, 'वाङ्‌मय प्रवाह आणि १९६० नंतरचे सामाजिक पर्यावरण' या विषयावर तातोबा बदामे, 'वाङ्‌मयीन प्रवाहांची फलश्रुती" या विषयावर वि. दा. वासमकर निबंध वाचन करणार आहेत. 'दलित व मुस्लिम साहित्यप्रवाह' या विषयांतर्गत दुसऱ्या सत्रात 'मुस्लिम साहित्याची संकल्पना' या विषयावर राजेखान शानेदिवाण, 'मराठी साहित्य आणि सुफी संप्रदाय' या विषयावर सुजय पाटील, 'दलित साहित्य संकल्पना' या विषयावर शरद गायकवाड, 'मराठीतील दलित साहित्य' विषयावर दत्ता पाटील निबंध वाचन करणार आहेत.

ग्रामीण व विज्ञान साहित्य प्रवाह विषयांतर्गत तिसऱ्या सत्रात 'ग्रामीण साहित्याची संकल्पना' या विषयावर दत्ता घोलप, 'मराठीतील ग्रामीण साहित्य" या विषयावर सुनिल चंदनशिवे, 'विज्ञान साहित्य संकल्पना' या विषयावर अमर कांबळे, 'मराठीतील विज्ञान साहित्य" या विषयावर जयकर दमामे निबंध वाचन करणार आहेत. स्त्रीवादी व आदिवासी साहित्यप्रवाह विषयांतर्गत चौथ्या सत्रात 'स्त्रीवादी साहित्याची संकल्पना' या विषयावर मानसी लाटकर, 'मराठीतील स्त्रीवादी साहित्य" या विषयावर उदय जाधव, 'आदिवासी साहित्य संकल्पना' या विषयावर कैलास महाले, 'मराठीतील आदिवासी साहित्य' या विषयावर सुभाष पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2017
सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभात शाहीर आझाद नायकवडी पोवाडा सादर करताना.**

# ग्रंथ महोत्सवास उस्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त तीनदिवसीय ग्रंथ महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डॉ. एम. एस. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलंन करून महोत्सवाचे उद्घाटन झाले. यानिमित्ताने शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं!' हा सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

यंदाही प्रकाशक ग्रंथ महोत्सवात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. दहा उपाहारगृहांचे स्टॉल लावल्याची माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी येथे दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे व ग्रंथपाल डॉ. खोत यांच्यासह बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. ए. बी. गुरव यांनी सर्व स्टॉलना भेटी दिल्या व सहभागी प्रकाशक, उपाहारगृह चालक यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. या वेळी उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांच्यासह ग्रंथालयातील सर्व प्रशासकीय सेवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनानंतर ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं!' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाहीर आझाद नायकवडी यांनी ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाचा इतिहास सर्वांसमोर ठेवला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2017
लोकमत

# मराठी राजभाषा दिन कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे 'मराठी भाषा गौरव दिन' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, काव्यवाचन, निबंध लेखन, पथनाट्य स्पर्धा, निमंत्रित कवींचे संमेलन, 'मराठी साहित्यातील वाङ्मयीन प्रवाह' विषयावर चर्चासत्र, विद्यार्थ्यांसाठी विकीपीडिया नोंद कार्यशाळा, आदी उपक्रम विद्यापीठ आणि उच्चशिक्षण सहसंचालक कोल्हापूर विभागातर्फे शहर, ग्रामीण भागात राबविले जाणार आहेत.

सोमवारी (दि. २७) सायंकाळी साडेसहा वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात मराठी भाषेचा गौरव वाढविणारा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. त्यात अभंग, भारुड, गोंधळ, पोवाडा, लावणी, तंत्रकवी, स्त्री साहित्य, मंगळागौर, लग्नगीत, भोंडला, संगीत नाट्य, विद्रोही साहित्य, प्रहसन आदींद्वारे भाषा व संस्कृती संवर्धनाचा जागर केला जाणार आहे.(प्रतिनिधी)

26 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मराठी अमुचि मायबोली' सोमवारी कार्यक्रम

## पुष्कर श्रोत्री, सोनाली कर्णिक, सुचित्रा भागवत, उदेश उमप यांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ आणि राज्य शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने 'मराठी अमुचि मायबोली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. २७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता येथील ऐतिहासिक केशवराव भोसले नाट्यगृहात होणाऱ्या या कार्यक्रमाचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

कार्यक्रमास कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात होणार आहे, अशी माहिती डॉ. नांदवडेकर यांनी दिली. नकाशे एन्टरटेन्मेंटची प्रस्तुती असलेल्या या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य, नाट्य, गीत-संगीताच्या माध्यमातून मराठी भाषा व संस्कृतीची महान परंपरेचे दर्शन घडवण्यात येणार आहे. यात अभंग, भारूड, गोंधळ, पोवाडा, पारंपरिक लावणी, तंतकवी, स्त्री साहित्य, मंगळागौर, लग्नगीत, भोंडला, संगीतनाट्य, विद्रोही साहित्य, प्रहसन आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमात अभिनेता पुष्कर श्रोत्री, गायक धनंजय म्हसकर, उदेश उमप, निरंजन भाकरे, गायिका सोनाली कर्णिक, सुचित्रा भागवत आदी सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे लेखन अजित परब व मंदार खराडे यांनी केले असून दिग्दर्शन व संकल्पना सुभाष नकाशे यांची आहे. सुनील कुलकर्णी निर्मिती सूत्रधार आहेत.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठामार्फत आठवडाभर विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यामध्ये निबंध लेखन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, निमंत्रितांचे कवी संमेलन, वाङ्मयीन प्रवाह या विषयावर चर्चासत्र, माझी शाळा-मराठी शाळा या विषयावर पथनाट्य, विकीपिडिया नोंदलेखन कार्यशाळा आदी उपक्रमांचा समावेश आहे, अशी माहितीही डॉ. नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2017
Times of India

# Varsity to host Marathi event

TIMES NEWS NETWORK

**The event will feature dance performances, plays and musical shows**

**Kolhapur:** A special cultural programme will be hosted by the Shivaji University, Kolhapur (SUK) for Marathi Bhasha Gaurav Din at the Keshavrao Bhosale Natyagruha on Monday.

"Termed as the Marathi Amuchi Myboli, the programme will have Kolhapur Zilla Parishad's chief executive officer Kunal Khemnar as the chief guest along with SUK vice-chancellor Devanand Shinde," said registrar, Vilas Nandavadekar.

He added that the programme will be witness to spectacular dance performances, plays and musical events along with traditional folk music performances from the participants.

That's not all. The programme will also witness extravagant performances by Marathi film actor Pushkar Shrotri, singer Dhanajay Mhaskar, Sonali Karnik, Suchitra Bhagwat and others.

"During the celebration of Marathi Bahsha Gaurav Din, the university has organised several events on campus and at other affiliated colleges," said Nandavadekar.

Essay writing competition, panel discussion on several topics, street plays and a workshop on editing for online platforms are only some of the many events that have been planned for the celebration.

Nandavadekar appealed to citizens to attend the special cultural program in large numbers. Starting from 6.30pm, the event is free of cost for the general public.